# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चामहा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली— ४४२६०५

फोन/फॅक्सनंबर ०७१३२—२१६५९४

E-Mail :college.section@unigug.ac.in

गो.वि./म.वि./2644/२०२२

दिनांक: 10 /०६/२०२२

## परीपत्रक

विषय:— घडयाळी तासिका तत्वावरील शिक्षक मान्यतेबाबतच्या प्रस्तावाबाबत.

संदर्भ:—दिनांक ०५ मे. २०२२ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषद सभेचा निर्णय

**विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहे अशा सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, पदव्युत्तर अभ्यासक्रमातील शिक्षकांबाबत दिनांक ०५/०५/२०२२ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरीषदेमध्ये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.**

"विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात सुरू असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित शिक्षकांची नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णयाप्रमाणे महाविद्यालयाने कार्यवाही घेवुन विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करावा. नियमित शिक्षक न मिळाल्यास घडयाळी तासीका तत्वावर **(सी.एच.बी) शिक्षकांची नियुक्तीचे प्रस्ताव ३१ जुलै, २०२२ रोजी पर्यत विद्यापीठाकडे सादर करावे. विषयानुसार तासीका शिकविण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारीत** करण्यात आला''

करिता उक्तप्रमाणे झालेल्या निर्णयानुसार संस्था/महाविद्यालयानी तातडीने महाविद्यालयात सुरू असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित शिक्षक नियुक्तीची कार्यवाही सुरू करून प्रस्ताव **विद्यापीठाकडे सादर करावेत. तसेच नियमित शिक्षक न मिळाल्यास घडयाळी तासीका तत्वावर शिक्षकांच्या नियुक्तीचे प्रस्ताव दि. ३१ जुलै, २०२२ पर्यत मान्यतेकरीता विद्यापीठात सादर करावे.**

संलग्नित :—प्रपत्र

मा. प्र—कुलगुरू यांच्या मान्यतेने

10/6/22

(देवेंद्र एम. झाडे)

सहाय्यक कुलसचिव

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी :—

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र—कुलगुरू महोदय, यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:— सी.एच.बी. शिक्षक मान्यताकरिता आवश्यक दस्ताऐवज

संस्थेचे नांव:—

महाविद्यालयाचे नांव:—

| अ. क्र | सोबत लागणारे दस्तावेज | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | संस्था/ प्राचार्याच्या लेटरहेड वर प्रस्ताव सादर करावा. | |
| २ | संस्थेचा दिलेला नियुक्ती आदेश | |
| ३ | उमेदवाराचे रूजू पत्र सादर करावे. | |
| ४ | कार्यभार तक्त्यात (अनेक्झर —सी) माहिती सादर करावी. | |
| ४ | उमेदवाराचे १० वी पासुन ते पदव्युत्तर पर्यंत शैक्षणिक कागदपत्रे सादर करावे | |
| ५ | जातीचे प्रमाणपत्र सादर करावे. | |
| ६ | मा. सहसंचालक, नागपुर यांचे पद मान्यता पत्र झेराक्स प्रत सादर करावी | |
| ७ | कार्यभार विवरण तक्ता प्रपत्र अ व ब मध्ये सादर करावे. | |
| ८ | संस्थेने नियमानुसार वृतपत्रात शैक्षणिक अर्हतेच्या तपशिलासह प्रसिध्द केलेली मुळ जाहिरातीची प्रत सादर करणे अनिवार्य आहे. | |
| ९ | चालु सत्राचे सलंग्निकरण आणि नादेय प्रमाणपत्र सादर करावे | |
| १० | महाविद्यालयाचे वेळापत्रक | |
| ११ | निवड समितीचा अहवाल व उमेदवारांचे उपस्थिती पत्रक, | |
| १२ | संलग्नित केलेले प्रपत्र (अ) व (ब) ची माहिती सादर करावी. | |
| १३ | अनुदानित महाविद्यालयांनी CHB म्हणुन नियुक्त केलेल्या उमेदवारांचे रु. १००/— च्या स्टॅम्प पेपरवर घेतलेल्या हमीपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी. | |
| १४ | नियमित शिक्षकांची पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेली असल्यास विद्यापीठ मान्यतेची साक्षांकित प्रत सादर करावी. | |
| १५ | शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (Transfer Certificate ) सादर करावे. | |
| १६ | महाविद्यालयाने नियुक्त केलेल्या घडयाळी तासिका तत्वावरील अध्यापक एकाच महाविद्यालयामध्ये कार्यरत असल्याबाबतचे संस्थेचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांचे हमीपत्र | |
| १७ | उपरोक्त सर्व प्रपत्रे व दस्ताऐवज प्राचार्य/अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित केलेले असणे आवश्यक राहील. | |
| १८ | इतर संबंधित प्रपत्रे आवश्यकतेनुसार | |

प्राचार्य / अध्यक्ष / सचिव